Impact Factor (SJIF): 6.092 E-ISSN: 2583-1615

International Journal of Research in Academic World

Received: 22/March/2024 IJRAW: 2024; 3(4):199-201 Accepted: 29/April/2024

# निसर्ग व वारली चित्रातील समरूपता

*[1]मिलिंद पुंडलिकराव जाधव

*[1]शिक्षक, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, कन्या भोकर, नांदेड, महाराष्ट्र, भारत।

**सारांश**

महाराष्ट्र राज्याच्या काही प्रदेशात विशेषतः ठाणे, पालघर जिल्हयाच्या भागात वारली आदिवासी जमात लहान लहान (वस्ती) पाडे करून राणावनात राहते. निसर्गाच्या सानिध्यात त्याचे वास्तव्य असल्यामुळे त्यांची निसर्गाशी जवळीकता निर्माण झाली. ते निसर्गाशी फार एकनिष्ठ राहतात. निसर्गातील प्रत्येक गोष्ट ती सजीव असो वा निर्जिव, सूर्य चंद्र असो वा रानातला एखादा किटक सगळे वारली जमातीचे जीवलग. जीवनात पूर्णतः निसर्गाचा प्रभाव त्यामुळे शहरी संस्कृतीपासून आजही अनेक वारली लोक शहरापासून दुर आहेत. शेती, शिकार, मासेमारी, असे त्यांचे उद्योग आहेत. घरांच्या अर्थात सोपडीच्या कुडाच्या भिंतीवर मातीचा लेप देऊन त्यावर नैसर्गिक रंगाने चित्रे रेखाटने हे त्यांची संस्कृती. नैसर्गिक रंगापासून ते चित्रविषयापर्यंत सारे काही निसर्गाकडूनच घेतलेलं दिसून येते. त्यांच्या जगण्यात कृत्रिममपणा वा आधुनिकता नसतेच जणू. वारली चित्रकलेसह, त्यांचेसणसमारंभ, लग्नविधी, धार्मिक विधी यामध्येही निसर्गाचा प्रभाव असतो. निसर्ग व वारली चित्रातील समरूपता या लेखा मध्ये अभ्यासणार आहोत।

**मुख्य शब्दः** वारली कला, तारपा, आदिवासी।

**प्रस्तावना**

साधारणतः कला हा सर्वांचाच आवडता विषय असतो. बालक शाळा प्रवेशापूर्वी चित्रकलेचे धडे घराच्या भिंती, दरवाजा, बेड, फर्निचर, फरशी यावर पेंसिलने गिरवत असतो. औपचारिक शिक्षणाची सुरुवातच कला या विषयापासून होत असते जणू मग ती चित्रकला असेल, गाणे असेल वा ईतर कला. बालक आपल्या मनातील भावना हळूहळू त्यातूनउमटवत असतो. कला हाअभिव्यक्तीचा एक उत्तम मार्गआहे. कलेकडे एक उपचार पद्धती म्हणूनही पहिले जात आहे. असे असूनही चित्रकलेविषयी हल्ली म्हणावे तेवढी आस्था दिसत नाही. शिक्षणातील स्पर्धा, पालकांचे चित्रकला विषयी असलेली दूरास्था, शाळेत कला शिक्षकांचा अभाव, अशा कारणानेचित्रकला विषय प्राथमिक स्तरावर अनिवार्य असला तरी तो दुर्लक्षित ठरत आहे. शाळेत हा विषय केवळ मूल्यमापना पुरता हा विषय हाताळल्या जातो अशी देखिल अनेक ठिकाणी परिस्थिती आहे. त्यामुळे मुलेही या विषयात रुची दाखवत नाहीत.

बालभारतीच्या सहावीमराठीतील वारलीचित्रकलेचापाठ शिकवत असतांना विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील आदिवासी वारली संस्कृतीची ओळख करून देण्याचा प्रयत्न केला. पुढेविद्यार्थ्यांना वारली चित्रकलेचे धडेशिकवले मुलांनीही त्यालाखूप छान प्रतिसाद दिला. महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने सन २०१९ मध्ये नांदेड येथे शिक्षणाची वारी उपक्रम घेतला होता. या शिक्षणाच्या वारीमध्ये 'वारली चित्रकला-संस्कृती इतिहास व शालेय व्यवस्थापन सक्षमिकरण" हा विषयाचा स्टॉल लावला होता. वारली चित्रसंस्कृती-लोकजीवन व इतिहासाची ओळख या माध्यमातून विभागातील शिक्षक, पालक, विद्यार्थी वशालेय व्यवस्थापन समिती यांच्या पर्यंत व्हावी यासाठी चित्रप्रदर्शन, माहिती व प्रात्यक्षिक यांचे सादरीकरण झाले होते. तेव्हाही फार चांगला प्रतिसाद मिळाला.

**वारली संस्कृती परिचय**

महाराष्ट्रातील पालघर (पूर्वीचा ठाणे) जिल्ह्यातील डहाणू, तलासरी, मोखाडा, जव्हार तालुक्यात आदिवासींचीपाडे आहेत. तेथील आदिवासी वारलीसमुह स्वतःच्या एका आगळ्या संस्कृतीत जीवन जगतो. महाराष्ट्रासह गुजरातच्या सिमेवर दादरा, नगर हवेली मध्ये ही वारली संस्कृती रुजलेली आहे निसर्गाच्या सानिध्यात असल्यामुळे निसर्गातील विविध घटकांशी एकरूप झालेला समाजनैसर्गिक जीवन जगत एका वेगळ्या संस्कृतीची जोपासना केलेलादिसतो. निसर्गातील मुक्तवातावरणात वस्ती करून, शेती, शिकार करणे भटकणे, मासे पकडणे, पाण्यात पोहणे, अशातून ते आनंद मिळवतात. दिवाळी, शिमगा (होळी) या सारखे सण उत्सव मोठ्या आनंदाने साजरी करतात. स्त्री पुरुष सामूहिक नृत्य करतात. तारपा नृत्य हा त्यांचा प्रसिद्ध नृत्य आहे. विविध सण समारंभाला विधी यावेळी दारू व ताड़ी पितात. धार्मिक कार्यात कोंबडी, बकरी, ताड़ी, दारू आदी देऊन देवपूजा करतात. देवता आपल्यावर कोपू नये, रोगराई मृत्यु अशा आपत्ती यामुळे येणार नाहीत अशी त्यांचा भावना असते.

पाचशिऱ्या-पाचशिर असलेला देव (देव चौकात घोडयावर बसलेला

*Corresponding Author: मिलिंद पुंडलिकराव जाधव

असतो, पालघट (लग्न देवता देवचौकात मध्यभागी रेखाटलेली),
धरतरी-(धरित्री अर्थात धान्य देणारी देवी),
गावतरी (गायत्री)-शेतीच्या कामी उपयोगी पडणारी,

पावशा परमेसर-पाऊस, कणसरी-जीवन जगविणारी देवतायासहवाघदेव, नारनदेव, हिमाय देव आदी अनेक देव देवतांची पूजा केली जाते. धार्मिक विधी, देवतांचे पूजन आदी धार्मिक कार्य करणारा वारली समुहातील व्यक्ती म्हणजे' भगत'तो वैद्याचेही काम करतो.

## वारली विवाह संस्कृती

लग्न हा वारली समाजातील लोकांच्या आयुष्यातील आनंदाचा प्रसंग मानल्या जातो. मुलीच्या पित्याला मुलाच्या पित्याने खर्चासाठी व मुलीची किंमत म्हणून 'देज 'रूपात धान्य व रक्कम दिली जाते. लग्नाचा मांडव घालणे हे देखिल विशिष्ट पद्धतीच्या टप्यांनी होत असते. पूर्वी वारली जमात 'धवलेरी'बाईकडून लग्न लावून असत घेण्याची पद्धत होती आता बदल होत आहे. धवलेरी म्हणजे पुरोहित स्त्री.

## देवचौक/लग्न चौक

लग्नाच्या आदल्या दिवशी घरातील भिंतीवर चित्र काढल्या जाते त्याला देवचौक किंवा लग्न चौक लिहणे असे म्हणतात. देवचौक सहसा वारली सुहासिनी महिला काढतात. अशा बायकांना धवलेरी असे म्हणतात. स्नान, उपवास करून पवित्रभावनेने हे चित्र लिहतात. या देव चौकात एक मोठा चौकोन असतो. चौकोनाच्यावर सूर्य, चंद्र, झाडे पक्षी, मध्यभागी घोडा त्यावर नवरा मुलगा व मागे करवली असते. हा चौकोन लहान लहान त्रिकोण व चौकोनांनीसजविला जातो. वधुच्या घरात घोडयाचे तोंड बाहेरून दरवाज्याकडे तर वराच्या घरात घोडयाचे तोंड घराकडे असते चौकोनात वरात वराती काढल्या जातात. देवचौकात देवीचे चित्र ही असते. लग्न चौक आणि पालघट देवीचे नाते अतूट आहे. चौकामध्ये पालघट देवीचे चित्र रेखाटलेले असते. पालघटदेवीम्हणजे लग्न देवता (Goddess of Fertility) वर व वधु यांनाआशीर्वाद देते अशी श्रद्धा असते. सुहासिनी महिला अतिशयपवित्र भावनेने हे चित्र काढतात. पालघर देवीच्या आजुबाजुला कंगवा, शिडी अशी प्रतिके रेखाटतात. चित्रकारबाशिंगाच्या आकारचे नक्षी, किनार काढतो. सभोवती तारपा नृत्य वगैरेरेखाटून देव चौक वैशिष्ट्यपूर्ण ठरतो.

## वारली चित्रकला

गवती कुडाच्या भिंतीला शेणामातीचालेप देवून चित्रासाठी पार्श्वभूमी तयारकेली जाते. चुना, गेरू अथवा लाल मातीने त्यावर सारवणकेले जाते. बांबुची वा गवताची काडी (दाताने टोक चावून त्याचा ब्रश केला जातो) तांदुळाची पिठी, आंबवलेल्या तांदळाचेद्रावण असे नैसर्गीक रंग साहित्यवापरुन चित्रे रेखाटली जातात. चित्रात त्रिकोण, वर्तुळ, चौरस, रेषा, वक्र रेषा, अर्धगोलआदी भूमितीतील मूलभूत आकार वापरतात. प्रत्येक प्रसंगचित्रातघरातील वस्तुसंहगायी, बैल. कोंबडी, बकरी. कुत्री अशा पाळीवपशुपक्षांचा समावेश केलेला दिसतो. चित्रामध्ये दृष्टीला न दिसणाऱ्यागोष्टीचे चित्रण अर्थात क्ष-किरण चित्रे वारली चित्रात दिसतात. उदा. झोपडीच्या आत असलेल्या वस्तू किंवा आतील मानवांच्याचे आकार सहज दृष्टीत पडतात. चित्रामधील उत्सर्जनात्मक मांडणी हे देखील वारली चित्रकलेचे वैशिष्ट्य आहे. झाडाचे चित्र काढतअसतांना प्रथम मुळापासून चित्राची सुरुवात केली जाते.

## वारली चित्रकलेचे विषय

लग्नविधी, धार्मिक विधी या प्रासंगिक विषयासह वारलीचे दैनदिन जीवन, नृत्य, उत्सव, जत्रा, देव देवता, शेती, सुगी, पशुपक्षी, जंगल, शिकार आदी चित्रकलेचे विषय असतात. प्रागैतिहासिक काळातील आदिम कलेचा प्रभाव या वारली कलेत आहे आणि तीपरंपरेने अवगत केलेली आहे. वारली चित्रकला ही धार्मिक समारंभ करणे, देवदेवतांना संतुष्ट करणे, सणवार, रोगराईचे निवारण व संरक्षण आदी उद्देशानेआपल्या कुडाच्या भिंतीवररेखाटतात.

## तारपा नृत्य

वारली विविध सणाला विविध प्रकारे नृत्य करतात. त्यातील तारपा प्रसिद्ध आहे. तारपा नृत्याचे चित्र फार वैशिष्ट्यपूर्ण असते. सर्पिलाकार नृत्य सादर करतांना स्त्री पुरुष एकमेकांस पाठीमागून हातात हात धरतात. अशाप्रकारचेचित्र वारली चित्रकलेतील एक महत्वपूर्ण अंगअसतो. स्त्री व पुरुष अशा क्रमाने साखळी घातलेले नर्तक तारप्याभोवती तारपाच्या तालात नाचतात. याचे चित्र आकर्षकरेखाटले जाते. नृत्यातील रिंगण सर्पलाकार हालचाल अजुबाजूचे नैसर्गिक वातावरण झाडे पशुपक्षी, झोपड्या यानी असे चित्रखूपच शोभून दिसतात.

## शेतीशी संबंधीत कामांचे चित्रण

नागरणी, रोप लावणे, धान्य मळणे व बैलगाड़ीने धान्याची वाहतूक, शेतीची राखणदारी, गुरे चारणारा गुराखी तसेच वारलीचे भातशेतीशी संबंधीत कामाचे चित्रण हे देखीलवारली चित्रकलेतून दिसून येते. पीक शेतीतीलजीवजंतू, विंचू, साप, बेडूक, गांडूळ आदीदिसुन येतात. जंगलातील दृष्य व शिकार विविध प्रकारच्या वृक्षासह माळरान, टेकड्या, जंगल, डोंगर दऱ्यातील शिकारीचे दृष्य जंगलात लपलेले प्राणी, पशू, पक्षी, वाघा सारखे हिंस्र प्राणी आदीवारली चित्राचा विषय ठरतो. नदी, नाले त्यातील जीव एखादा वारली पाडा आणि जंगल व पाडा यांना विभाजीत करणारी नदी त्या नदीवरील पूल, नदीकाठी मासे पकडणारे, नदीतील मासे, खेडके, साप अशी चित्रातील विविधता प्रकर्षाने दिसून येते.

## निसर्ग व वारली चित्रातील समरूपता

वारली समुदाय हा निसर्गाच्या कुशीत राहत असल्याने साहजिकच निसर्गाचा परिणाम वारल्यांच्या जीवन शैलीवर परिणामी संस्कृतीवर झालेला दिसून येतो. शहरी संस्कृती पासूनदूर रहात आपल्या मुलभूत गरजेसाठीपूर्णतः निसर्गावर अवलंबन रहात. निसर्गातील अन्न, शेतीच्या माध्यमातून व शिकारीच्या माध्यमातून मिळवत असे. त्यांचा निवारा हा पूर्णत: नैसर्गिक साधन सामग्रीपासून तयार केलेला असतो. बांबू, ताडाची झाडे याच्यापासून बनविलेल्या, शाकारलेल्या झोपड्याही अदिवासी वारली लोकांची निवारे. घरगुती वापरातील वस्तू एवढेच नव्हे तर वारल्यांचे देवदेवता सुद्धा निसर्गातील असतात. हिरवा, देव, हिमाय देव, धरतरी, गावतरी, पावशा परमसर, कणसरी, वाघदेव-ही निसर्गातीलच मिळविलेले देवता. त्यामुळे साहजीकच वारली चित्रात निसर्ग उमटलेला दिसतो. वारली चित्रात ज्या मूलभूत भौमितीक आकार दिसतात जसेत्रिकोण, वर्तुळ, अर्धगोल, रेषा, आडव्या उभ्या रेषा, वक्ररेषा, वळणदार रेखा हया सुद्धा निसर्गातूनच भौतिक व जैविक रूपातील वस्तूकडून घेतलेलेदिसून येतात.

वारल्यांचे सणसमारंभ नैसर्गिकच, निसर्गावर अवलंबुन असलेलेवारली पिक घरी आणत असतेवेळी साजरे केलेजाणारे सण, नृत्य, दिवाळी, शिमगा आदीसणाला घेतला जाणारा आनंद, भाताच्या पिकाची राखण व भात शेती असे अनेक चित्र प्रसंगातून निसर्ग दिसत असतो. प्रत्येक वारली चित्रात पशु-पक्षी, पहाड, नदी, सूर्य, चंद्र शिकार, वन्यजीवप्रतिबिंबित होतात. चित्र रेखाटण्यासाठी लागणाचे साहित्यसुद्धा नैसर्गिकच, नैसर्गिक रंग, बांबुच्या काडीचा कुंचला निसर्गातून सहजचमिळविलेला असतो. निसर्ग हा मुक्त रंगाचा स्रोतआहे. माती, फळे, फुले, पाने, धान्य, याचा वापर रंगांसाठी असतो. वारली चित्रामध्ये जीवनातील वास्तव आणिकल्पना यांच्या संयोगातील चित्रकाम हे सुद्धा वारली चित्रकलेचेएक वैशिष्ट्य आहे.

झोपडीच्या कुडावरली कला जगाच्या कॅनवासवर गेली आहे. ती आता वारली पाडयापुरती राहिली नाही. जगभरात वारली चित्रकलेतून तयार झालेल्या कलाकृती, शोभेच्यावस्तू, कपडे, हस्तकलेच्या वस्तू यानामागणी आहे. विविध पर्स, बॅगा, टी शर्ट, साडया, उशीचे फॉल, रूमाल, फुलदाण्या, हॉटेल्स व ऑफीस सजावट, हॉल सजावट, स्टेज यावर वारली दिसत आहे. धार्मिक व पारंपारीक उद्देशाच्या पलीकडे वारली चित्रकला गेली आहे. पारंपारीक रंग, पार्श्वभूमी यांची जागा आता आधुनिक रंग व साहित्यानेघेतली आहे. वारली चित्रामध्ये जरी बदल होत असले तरी आदिम संस्कृतीपासून रुजलेल्या मुळ वारली कलेला व संस्कृतीला आपण जपले पाहिजे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये सर्व स्तरावर कला विषयाला न्याय देण्याबाबतच्या तरतुदी आहेत. निश्चितच यापुढील शिक्षणात वारली चित्रकलेसारख्या स्थानिक व पारंपरिक कलेची जोपासनाकरण्यासाठीचे पोषक असे वातावरण तयार होईल अशी आशा आहे।

## संदर्भ


1. डॉ. गारे गोविंद, वारली चित्र संस्कृती, श्रीविद्या प्रकाशन पुणे.
2. Madhukar Vadu, The mystical world of Warlis (Intach/notionpress.com)
3. देवधर संजय, वारली चित्रसृष्टी (कल्पक प्रकाशन, नाशिक)
4. https://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%B5%E0%A4%BE%E0%A4%B0%E0%A4%B2%E0%A5%80_%E0%A4%9A%E0%A4%BF%E0%A4%A4%E0%A5%8D%E0%A4%B0%E0%A4%95%E0%A4%B2%E0%A4%BE
5. https://www.mahamtb.com/Encyc/2019/2/23/Article-on-Warli-painting.amp.html